# मदर्स डे (१२ मे २०१९)

१२ मे १९९४ रोजी, २५ वर्षांपूर्वी माझी आई ह्या जगातून निघून गेली. तिचे एक मागणे देवाने पुरे केले. तिला आजारी पडल्यावर फार काळ अंथरुणात खिळून राहायचे नव्हते. मोटर न्यूरोन डिसीज मुळे अचानक शरीरावर हल्ला झाला, अगदी ३ महिन्यात आजार बळावला आणि डॉक्टरांनी आई अश्याच अवस्थेत काही दिवस अथवा काही वर्षेही राहू शकते असे सांगितले. आयुष्यात असंख्य प्रतिकूल परीस्थितीवर मात केलेली ही स्त्री, ह्या आजारातही सहज आम्हा तिघी बहिणींना म्हणाली, 'मी गलितगात्र अवस्थेत फार काळ काही जगणार नाही, मी एक दिवस झोपेतच निघून जाईन.'

अत्यंत स्वावलंबी, स्वयंसिध्द, स्वाभिमानी अशी धाडसी आई होती. आम्हा तिघी बहिणींना ह्याच गुणांचं शिक्षण तिच्या सहवासाने मिळाले. अत्यंत हसतमुख, मध्यरात्री आलेल्या पाहुण्याला चारी ठाव स्वयंपाक स्वतः बनवून खायला घालणे ही तिची पुरेपूर हौस होती. सोमवार ते रविवार अगदी रोज आजीचे, बाबांचे आणि तिचे नातेवाईक किंवा बाबांची मित्र मंडळी अक्षरशः वार लावल्याप्रमाणे माझ्या आईच्या हातचे पदार्थ खायला यायचे. दादर स्टेशन जवळ घर म्हणून पै-पाहुणा रोजच असायचा. आम्ही आमच्या घराला Platform no 6 म्हणायचो. तेव्हा दादर स्टेशनला ५ platform होते आणि Bombay Central/VT ला बाहेरगावची गाडी पकडायला आणि Santacruz airportला परदेशात जायला मुंबईलाच यायला लागायचे. मग माझ्या आईच्या हातचा लज्जतदार पाहुणचार, मुक्काम, मुंबईदर्शन ही आमच्या पाहुण्याना पर्वणीच होती. शिवाय आमच्या घरून निघताना आलेल्या पाहुण्याला त्याच्या आवडीचा खाऊ बरोबर बांधून मिळायचा. मला कधी आमच्याकडे रतीबासारखे येणाऱ्या पाहुण्यानी आईला कुठली भेटवस्तू आणलेली कधीच आठवत नाही. माझी आई पुण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याच शहरात फिरायला गेली नाही. माझी आई स्वभावतःच समाधानी होती. मी आमच्या नात्यातल्या काही इतर स्त्रियांप्रमाणे तिला कधीच कपडे, दागिने ह्याकरता वखवख केलेली पहिली नाही. तिला अतिशय निगुतीने संसार करायचा होता. आयुष्यभर महत्वाच्या टप्प्यावर बिकट आर्थिक चणचण सहन करावी लागली. अत्यंत कष्ट करत तिने आम्हा तिघी बहीणींना मोठ्ठं केलं. एक आई म्हणून ती कायमच अलौकिक होती. आम्हाला तिघींना अभ्यासाव्यतिरिक्त घरातलं एक काम करू दिलं नाही आणि आम्ही पण त्याची जाणीव खूप उशिरा करून घेतली. तिचं कामाचं नियोजन नुसतं observe करूनच आम्हाला तिघींना कामाचा उरक निगुतीने कसा करायचा हे बाळकडू मिळाले.

माझी आई तिच्या घरातील शेंडेफळ आणि तिचा सर्वात मोठा भाऊ तिच्यापेक्षा २२ वर्षांनी मोठ्ठा. सर्व भाचरं आईचे दोस्त. अनेकांची गुपितं अगदी तिच्याजवळ सुरक्षित. आईबरोबर आमच्या घरात तिची

भाचरं आणि त्यांच्या गप्पा सुरु झाल्या की आम्हाला आमच्या आईचे  प्रेम वाटले जात आहे असे वाटायचे. आमच्या नात्यातल्या सर्व समारंभात माझी आई पदर खोचून तयार. लग्नकार्यात तर मौल्यवान चीजवस्तू सांभाळणे हे काम नेहमीच माझ्या आईच्या ताब्यात. आजपर्यंत माझ्या आईच्या हयातीत अथवा पश्चात अजून पर्यंत एकही व्यक्ती मला माहित नाही जी कधीही माझ्या आईबद्दल काही वावगं बोलली असेल. त्यामुळेच पुण्याला सुट्टीला आल्यावर माझी आई कुठल्या भावाकडे आणि तिच्या बहिणीकडे किती दिवस राहणार ह्याचे प्लान्स आधीच तयार असायचे. प्रत्येक वहिनीला भेटवस्तू आणि भाचरांना खाऊ बरोबर घेतल्याशिवाय ती मुंबई सोडतच नसे. शिवाय काही खाऊचे extra पुडे असायाचे कारण जर काही अनपेक्षित भेटी झाल्या तर रिकाम्या हाताने कसे भेटायचे ? हा विचार.

मी सहावीत असताना एकदा एक टुमदार घराचे चित्र काढले होते. डोंगर, धबधबा, बाग, भरपूर फुलं, फळझाडं आणि पोर्च मध्ये विणकाम करत बसलेली आई. आणि मी आईला सांगितलं होत अगदी असं घर मी स्वतः एक दिवस बनविन आणि कायमची तुला त्या घरात रहायला देईन, मग तू बाग सांभाळ आणि विणकाम कर. माझी आई म्हणायची ,'तू लाख म्हणतेयस पण तुझ्या नवऱ्याने मानले तर ना ?' आणि माझे नेहमी एकच उत्तर असायचे, 'मग एक तर माझी अट मानेल असा नवरा शोधीन नाहीतर लग्नच करणार नाही.'

आईच्या सुदैवाने तिला तीनही जावई पोटच्या मुलांप्रमाणे मिळाले. तीनही जावयात तिला  विशेष प्रेम कुणाबद्दल ? ही चढाओढ कायम राहिली. आईच्या हयातीत तीनही मुली आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि कर्तुत्ववान झाल्या आणि आईच्या दृष्टीने संसाराच्या समाधानाच्या ज्या कल्पना होत्या त्या तिच्या तीनही मुलींच्या आयुष्यात आकाराला आलेल्या दिसल्या. आयुष्याच्या ह्या टप्प्यावर अनेक वेळा ती आम्हाला तिघींना म्हणायची, आता तिघींना एक एक मूल झाल की माझं काम संपल आणि मी तुम्हा सर्वांचा निरोप घेईन. तिच्या दृष्टीने कुठल्याही व्यक्तीने अश्या वेळी entry आणि exit घ्यावी ज्यावेळी त्या व्यक्तीची समाजातील किमंत अबाधित राहिलेली असते.

पुढे मी खरोखरच एक टुमदार घर बांधले अगदी माझ्या सहावीतल्या काढलेल्या चित्राप्रमाणे डोंगराच्या जवळ, धबधबा तर अगदी माझ्या garden मध्ये संपूर्ण पावसाळा असतो . फक्त विणकाम करत बसलेली आई मात्र नाही. माझ्या आईच्या मृत्युनंतर २ वर्षांनी माझे चित्रातले घर बनले. आता आई पण आहे पण ती पिवळ्या सोन चाफ्याच्या वृक्षाच्या रुपात पोर्चच्या समोर वाट बघत उभी असते . तिच्या पायाशी तिच्या आवडत्या  निरनिराळ्या  रंगातला  गुलाब ताटवा  आहे. बाग सर्व फळा-फुलांनी सदैव भरलेली असते, जणू आई तिची काळजी घेतच आहे. माझ्या बहिणीही सवडीप्रमाणे येऊन माझ्या फार्म वर राहून जातात. ५ वर्षापूर्वी वडील वारले. त्यांच्या आठवणीत

कोपऱ्यात कैलासपतीचे झाड लावले आहे. त्याला फुलं यायला ७ वर्ष लागतात. तो आपल्या गतीने बहरेल. तोपर्यंत पिवळा सोनचाफा सदैव बहरत आपल्या अस्तित्वाने आणि सुवासाने बागेची शोभा अबाधित ठेवायचे कार्य चालूच ठेवेल.

**आशा अग्निहोत्री**